# मेट्रो-३ अंतर्गत चर्चगेट-हुतात्मा चौक स्थानकादरम्यान बोगदा तयार

**मुंबई (प्रतिनिधी) :**



कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मार्गावरील चर्चगेट ते हुतात्मा चौक येथील मेट्रो स्थानकादरम्यान असलेला बोगदा पूर्ण करण्यात आला. मेट्रो ३ च्या मार्गातील हे ३३ वे भुयारीकरण आहे. मेट्रो-३ प्रकल्पाचे आतापर्यंत एकूण ८८ टक्के भुयारीकरण व ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.

चर्चगेट ते हुतात्मा चौक स्थानकांतील अंतर ६५३ मीटरचे आहे. भुयारीकरणादरम्यान एकूण ५०२ रिंग्जचा वापर केला गेला. अवघ्या २७५ दिवसात डाऊन लाईन मार्गाचे भुयारीकरण एनएटीएम बोगद्यात पूर्ण करण्यात आले. एनएटीएम बोगद्यात पूर्ण होणारे हे मेट्रो-३ चे पहिलेच भुयारीकरण आहे. सूर्या-२ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल-मोड हार्ड-रोक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हा बोगदा खणण्यात आला. दरम्यान, चर्चगेट आणि हुतात्मा चौक स्थानकादरम्यान असलेली व्यापारी केंद्र याद्वारे जोडली जातील.